# उल्हासनगर महानगरपालिका

## "जागरूक पालक सुदृढ बालक" अभियान

## प्रेसनोट व जाहिर आवाहन

मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या सुचनेनुसार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२३ पासून उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "जागरूक पालक सुदृढ बालक" हे अभियान राबविण्यात येणार आहे. यामध्ये 0 ते 18 वर्षापर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, शिक्षण विभाग यांच्या समन्वयाने शालेय आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. येत्या ८ आठवड्यांमध्ये शहरातील अंगणवाडी केंद्र, शासकीय व निमशासकीय शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, बालसुधारगृह, अनाथालये, खाजगी नर्सरी व शाळा यामध्ये आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या अभियानाच्या अंमलबजावणी करिता मा. आयुक्त , उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०७/०२/२०२३ रोजी महानगरपालिका स्तरीय शहर कृतीदल समितीची बैठक घेण्यात आली.

"जागरूक पालक सुदृढ बालक" या अभियानाचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे:

- 0 ते 18 वर्षापर्यंतच्या बालकांची / किशोरवयीन मुला-मुलींची प्राथमिक आरोग्य तपासणी करणे.
  आजारी आढळलेल्या बालकांवर त्वरित उपचार करणे
- गरजू आजारी बालकांना संदर्भ सेवा देऊन उपचार करणे. (उदा. औषधोपचार, शस्त्रक्रिया, ई.)
- प्रतिबंधात्मक आरोग्य सुविधा पुरविणे.
- सुरक्षित व सुदृढ आरोग्यासाठी समूपदेशन करणे.

दिनांक ०९/०२/२०२३ रोजी "जागरूक पालक सुदृढ बालक" या अभियानाचे शुभारंभ राज्यस्तरावरून ऑनलाईन लिंकद्वारे मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री व मा. आरोग्य मंत्री , महाराष्ट्र राज्य यांच्या कडुन करण्यात येणार आहे. राज्य शासनाचा हा अत्यंत महत्वाकांक्षी कार्यक्रम असुन हे अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शहरातील सर्व नागरिकांना जाहिर आवाहन करण्यात येत आहे.

तसेच मा. मंत्री महोदय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी निर्देशित केल्यानुसार दिनांक ०९/०२/२०२३ रोजी राज्यभर आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

| अक्र. | दिनांक | आरोग्य शिबिराचे स्थळ | शिबिराची वेळ |
|---|---|---|---|
| १ | ०९/०२/२०२३ | मिडटाऊन रोटरी क्लब, गोलमैदान उल्हासनगर - १ | सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० |

08/02/2023

(डॉ. अनिता सपकाळे)
वैद्यकिय आरोग्य अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांची मान्यता**